CONTEMPORARY RESEARCH IN INDIA
ISSN 2231 - 2137

# सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी शिक्षकांची भूमिका

***साधना बिडवे,*** *संशोधक विद्यार्थिनी, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर*

| Received: 24/01/2018 | Edited: 07/02/2018 | Accepted: 21/02/2018 |
|---|---|---|

***सारांश:*** *शिक्षक हा शिक्षण प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे. शिक्षण देणे हाही एक व्यवसायच आहे. शिक्षकाच्या अंगी अध्ययन अध्यापनाचे गुण असायला हवेत. स्वत:चे अध्यापन कितपत यशस्वी झाले त्याचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी त्यांने घ्यायला हवी. सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षकांनीही आपल्या सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी प्रयत्न करायला हवेत. युनोस्कोने शिक्षकांच्या दर्जाविषयी १९६८ मध्ये म्हटले होते की, ‘‘समाजाला शिक्षक पुरविण्याची गरज लक्षात घेऊन शिक्षण क्षेत्रात प्रवेश करणाऱ्यासंबंधी धोरण आखावयास पाहिजे. ज्या शिक्षकांच्या अंगी नैतिक, बौद्धीक व शारीरिक गुण व त्यांच्या जोडीला आवश्यक ते व्यावसायिक ज्ञान व कौशल्य असेल असेच शिक्षक प्रवेशक्षम असे समजले पाहिजे. हे आजही तितकेच महत्त्वाचे आहे.*

***बीज - शब्द:*** *शिक्षक, शिक्षण, व्यवसाय, व्यावसायीक विकास.*

---

**प्रस्तावना:**

शिक्षणाच्या क्षेत्रात शिक्षकांचे स्थान व कृती या दोन्ही बाबी महत्त्वाच्या आहेत. आपल्या देशात प्राचीन काळापासून परंपरेने शिक्षकांनी फार मोठे मानाचे स्थान भूषविले आहे. आजही शिक्षकांकडे समाज आदराने पाहतो. समाजात अनेक व्यक्ती विविध व्यवसाय करताना आढळतात. आपल्या मुलभूत गरजा, जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी व्यावसायिक धडपडत असतो. शिक्षण देणे हाही एक व्यवसायच आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास करण्यासाठी शिक्षकाला आपल्या व्यवसायात ज्ञान, भावना, कृती, यांचा संतुलित विकास घडवून आणावा लागतो. शिक्षकांचा व्यवसाय हा इतर व्यवसायापेक्षा वेगळा आहे कारण त्यांचा संबंध चालत्या-बोलत्या विद्यार्थ्यांशी आहे व आजचा विद्यार्थी उद्याचा भावी नागरीक आहे. भारतीय शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ.डी.एस.कोठारी म्हणाले होते, ‘‘शिक्षक हाच शिक्षणातील अत्यंत महत्त्वाचा घटक होय’’. यामुळे आज जरी विज्ञानाने, तंत्रज्ञानाने प्रगती केली असली तरी समाजात मूल्यशिक्षण, नैतिक शिक्षण यासाठी शिक्षकाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. परंतु आज ज्ञानाच्या प्रस्फोटामुळे, ज्ञानार्जनाची साधने वाढल्यामुळे शिक्षकांच्या व्यवसायातही आव्हाने वाढलेली आहेत. भारतीय संस्कृतीतील समाजातील शिक्षकांचे उच्च व माननीय स्थान अलिकडे कमी होत चालले आहे. अभ्यासक्रमाचा, अध्यापन पद्धतीचा विस्तार झाला आहे. आज शिक्षक-प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. शिक्षक आपले विद्यादानाचे कार्य मनोभावे करीत नाहीत असे सर्वसामान्य मत बनले आहे. सामाजिक जीवनमूल्यात फेरबदल होत असल्याने याचा परिणाम शिक्षणव्यवस्थेवर होत आहे. यामुळे शिक्षकांनी आपले स्थान, समाजातील प्रतिष्ठा व स्वत:च्या व्यवसायातील समाधान टिकवून ठेवण्यासाठी सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास केला पाहिजे.

**सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास:**

सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास म्हणजे Continuous professional Development प्राचीन काळात ज्ञान मिळविणे व ज्ञानदान करणे हे ऋषीऋणाची फेड समजली जात होती. परंतु मध्यांतरीच्या काळात प्राचीन शिक्षण परंपरा खंडित झाली. अध्यापनाकडे एक व्यवसा म्हणून पाहिले जाऊ लागले. शिक्षक हा व्यावसायिक बनला यामुळे अध्यापन करणे हा त्याचा व्यवसाय बनला.

CPD- is a planned, continuous and lifelong process wherby teachers try to develop their personal and professional qualities, and to improve their knowledge, skills and practice, leading to their empowerment, the development of their organization and their pupils.’’

वरील व्याख्येवरुन लक्षात येते की, सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे ज्यात शिक्षक आपली वैयक्तिक व व्यावसायिक गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न करीत असतात. यामुळे त्यांचे ज्ञान, कौशल्य, सराव यात वाढ होते. या व्यावसायिक विकासाचा फायदा शाळेला व त्यांच्या विद्यार्थ्यांनाही होतो. कोणत्याही व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीमध्ये त्या व्यवसायाशी संबंधित योग्यता असली पाहिजे. शिक्षकाच्या व्यवसायातही ही गोष्ट लागू पडते. शिक्षकाचा व्यवसाय हा भूतकाळ आणि भविष्यकाळाला जोडतो, तसेच चालू काळात जिवंत राहून भविष्यकाळासाठी गठण करतो. यामुळेच शिक्षकी व्यवसाय हा एक पवित्र व्यवसाय मानला जातो. या व्यवसायाच्या माध्यमातून अन्य व्यक्तीवर संस्कार करता येतात. हा एक स्वतंत्र

व्यवसाय आहे. शिक्षकाला आपल्या कल्पनेनुसार, बुद्धीनुसार व विचारानुसार यात बदल करता येतात. शिक्षकी व्यवसाय हा समाजाच्या प्रगतीशी संबंधित व्यवसाय आहे. समाजाची उन्नती शाधणे ही या व्यवसायाची जबाबदारी आहे. यामुळेच शिक्षकांनी भावी राष्ट्राच्या उभारणीसाठी व्यावसायिक विकास करणे आवश्यक आहे यामुळेच अलिकडे सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास आणि शिक्षक हा विषय पुढे येत आहे. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमात व्यावसायिक विकासावर भर देण्यात आला आहे.

**सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासात शिक्षकाची भूमिका:**

सध्याचे युग हे विज्ञानाचे युग आहे, तंत्रज्ञानाचे युग आहे पण याचबरोबर आज या विज्ञानासोबतच मूल्यशिक्षण, नैतिक शिक्षण यांचीही समाजाला गरज आहे. आज आपण समाजाकडे बारकाईने पाहिल्यास आपल्या लक्षात येते की, मानवाने विज्ञानाच्या जोरावर खूप प्रगती केली परंतु आज समाजातील काही घटना या मूल्यशिक्षणाच्या अभावामुळे विध्वंसक रुप धारण करीत आहेत. समाज सुधारण्याचे माध्यम म्हणजे शाळा व भावी नागरीक घडवणारे शिक्षक यामुळे पुन्हा समाज घडवण्याची जबाबदारी शिक्षकावरच येते. यामुळे अलीकडच्या काळात शिक्षकाला अनेक भूमिका पार पाडाव्या लागत आहेत व यासाठी त्याला स्वतःचा व्यावसायिक विकास करणे आवश्यक आहे.

**१) आत्मनिरीक्षकाची भूमिका:**

शिक्षणकार्य ही आत्मउन्नतीची साधना आहे. हे एक पवित्र कार्य आहे. यामुळे शिक्षकाने आपल्या व्यावसायिक विकासासाठी आत्मनिरीक्षण करणे आवश्यक आहे. जो व्यवसाय मी स्विकारला आहे त्या व्यवसायासाठी लागणारी कौशल्ये माझ्याकडे आहेत का ? कोणत्या कौशल्यात मी सुधारणा करणे गरजेचे आहे ? अशा प्रश्नाद्वारे अध्यापन कौशल्ये विकसित करणे गरजेचे आहे. अध्यापन करीत असलेल्या विषयाचे ज्ञान, स्वतःच्या विषयावर प्रभुत्व, अध्यापन कौशल्ये, अध्यापनानंतर प्रभावी मूल्यमापन या बाबी शिक्षकाने स्वतः निरीक्षण करायला हव्यात.

**२) व्यावसायिक सेवेविषयी भूमिका:**

कोणत्याही व्यावसायिकाचे पहिले लक्षण हे आपल्या व्यवसायाबद्दल आपुलकी, जिव्हाळा, प्रेम होय. शिक्षकाला सेवेत असताना विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. यामुळे व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या प्रत्येक गोष्टीची त्याला माहिती असायला हवी. शिक्षकाला नव्या समाजपरिवर्तनाचा शिल्पकार समजतात यामुळे शिक्षक म्हणून त्यानी सेवाधर्म स्विकारायला हवा. विद्यार्थ्यांना दैवत मानून त्यांच्यामार्फत ज्ञान पोहोचवून त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार दयायला हवा. यामुळे विविध ज्ञानाच्या स्त्रोतातून त्याने ज्ञानार्जन करायला हवे. प्रशिक्षणाद्वारे, उद्बोधनाद्वारे आपल्या अध्यापन कौशल्यांचा, व्यवसाय कौशल्यांचा विकास करायला हवा.

**३) समाजाविषयी शिक्षकाची भूमिका:**

माणूस हा समाजशील प्राणी आहे. तो समाज करुन राहतो. शिक्षणातून समाजाचा विकास अभिप्रेत आहे. शिक्षक हा समाज मनाचा आरसा आहे. समाज सुधारण्याची जबाबदारी शिक्षकांवरच आहे कारण उद्याची भावी पिढी शाळेतच आकार घेत असते. शिक्षक ज्या समाजात सेवेत आहे त्या समाजाची भौगोलिक परिस्थिती, संस्कृती, विचार या गोष्टीचा त्याने अभ्यास करायला हवा. समाजात संस्कृतीचे संक्रमण हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे. हे कार्य शिक्षकच करतात. संस्कृतीचे संक्रमण होणे खूप गरजेचे आहे कारण समाजाचे अस्तित्व आणि सातत्य हे संस्कृतीवरच अवलंबून असते. समाजाचा दर्जा शिक्षणावरच अवलंबून असते. यामुळे शिक्षकाची समाजाविषयीची भूमिका नेतृत्वाची असावयास हवी. त्याची समाजातील प्रतिष्ठा उंचावण्यासाठी त्याने व्यावसायिक विकास करावयास हवा. समाजरचनेत इष्ट ते बदल घडवून आणण्यासाठी स्वतःत बदल करायला हवेत. अंधश्रद्धा निर्मूलन, साक्षरता प्रसार, लोकसंख्या शिक्षण हे कार्यक्रम शिक्षकाने समाजातच राबवावेत. धर्मनिरपेक्षता, समानता, लोकशाहीची मूल्ये प्रसंगानुरुप समाजातही विकसित करण्याचा प्रयत्न करावा.

**४) शिक्षकाची शैक्षणिक तंत्रज्ञानविषयक भूमिका:**

सध्याचे युग हे विज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे युग आहे. आधुनिक काळात शिक्षकाला नवीन बदलाप्रमाणे बदल स्विकारावे लागणार आहेत. आपली भूमिका बदलावी लागणार आहे कारण शिक्षकाच्या मदतीशिवाय तंत्रविज्ञानातील कोणतेही साधन निरुपयोगी आहे. यामुळे शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षकाला आपले अध्यापन प्रभावी करण्यासाठी अधिकाधिक साधने व तंत्रे वापरता आली पाहिजेत. विविध तंत्रज्ञानाचा वापर करुन नवीन अध्यापनाच्या पद्धती, तंत्रे, कौशल्ये अवगत करावी यामुळे व्यावसायिक विकास होण्यास मदत होईल. इंटरनेटच्या माध्यमातून विविध कोर्सेस, अध्यापनाची तंत्रे व प्रभावी अध्यापनासाठी माध्यमे घ्यावीत. सातत्यपूर्ण व्यावसायिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या बाबीही तंत्रज्ञानामुळे माहित झाल्या आहेत यामुळे शिक्षकाने तंत्रज्ञान स्विकारुन काळासोबत बदलले पाहिजे.

**५) शिक्षकाची आधुनिक काळातील बदलती भूमिका:**

शिक्षक हा ज्ञान देणारा, माहिती देणारा एवढाच राहिलेला नसून आधुनिक काळात त्याची भूमिका बदलेली आहे. आज ज्ञानाचा प्रस्फोट होत आहे यामुळे शिक्षकाला आपली पारंपारिक भूमिका सोडून नव्या भूमिका स्वीकाराव्या लागतील. यामुळे त्याच्या भूमिका पुढीलप्रमाणे आहेत.

- शिक्षक
- मार्गदर्शक व समुपदेशक
- मदतनीस
- मित्र व सहकारी

- सामाजिक अभियंता
- प्रेरक, प्रोत्साहक
- ज्ञान व कौशल्याचा स्रोतक

अशा भूमिका पार पाडाव्या लागतात. या भूमिका पार पाडताना स्वतः पारंपारिक राहून चालणार नाही. त्याने स्वतः बदलले पाहिजे तरच व्यावसायिक विकास होणार आहे.

**६) व्यावसायिक विकासासाठी शिक्षकाची भूमिका:**

विज्ञान, तंत्रज्ञान यातील प्रगतीमुळे आजच्या युगातील विद्यार्थी म्हणजे शिक्षकांपुढे आव्हान आहे. ज्ञानाचे विविध स्त्रोत, माध्यमे यामुळे आज विद्यार्थ्यांची ज्ञानाची भूक वाढत आहे. यामुळे शिक्षकाने आपल्या व्यावसायिक विकासात प्रगती करणे आवश्यक आहे. यासाठी त्याने शैक्षणिक पात्रता वाढविली पाहिजे. प्रशिक्षणाद्वारे नवीन तंत्रे अवगत केली पाहिजेत. परिसंवाद, कार्यशाळा, सेमिनार यासाठी उपस्थित राहिले पाहिजे. विविध वर्तमानपत्रे, पुस्तके, मासिके यातून लेख प्रकाशित करावेत. शिक्षक व्यवसायासाठी स्वतःचे आत्मपरिक्षण, अंतर्निरीक्षण करावे. शिक्षणक्षेत्रातील संशोधनाचा अभ्यास करुन संशोधक वृत्ती वाढवावी. बदलत्या काळाप्रमाणे बदल स्विकारावेत व त्याचा उपयोग शिक्षणात करावा.

**समारोप:**

अशा प्रकारे आजच्या समाजात शिक्षकाला आपला सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास करण्यासाठी विविध भूमिकातून जावे लागणार आहे. वरील भूमिकांचा विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, शिक्षकाने आपली प्रत्येक भूमिका प्रमाणिकपणे, निष्ठेने पार पाडली तर आपोआपच त्याचा व्यावसायिक विकास होईल व त्याला व्यावसायिक समाधान मिळेल. बदलत्या काळात शिक्षकाला सक्रिय राहणे गरजेचे आहे. आपल्या व्यवसायावर निष्ठा ठेवून कार्य केल्यास नक्कीच आनंद व समाधान प्राप्त होते.

**संदर्भ:**

१) डॉ.मोरे चंद्रकांत, डॉ.भिलेगावकर सदानंद (२००९) शिक्षक शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
२) डॉ.करंदीकर सुरेश, मंगरुळकर मीना (२००२), उद्योगन्मुख भारतीय समाजातील शिक्षण फडके प्रकाशन, कोल्हापूर.
३) डॉ.अहेर हिरा, (२०१०), उद्योगन्मुख भारतीय समाजातील शिक्षण व शिक्षक, सुविचार प्रकाशन, धंतोली नागपूर.

Printed by Deepak C. Nanaware, Palavi Printers, 129/498, Vasant Vihar, Nr. Old Pune Naka, Solapur - 413001 and published by Shilpa Deepak Nanaware, 129/498, Vasant Vihar, Nr. Old Pune Naka, Solapur - 413001 on behalf of Shilpa Deepak Nanaware, 129/498, Vasant Vihar, Nr. Old Pune Naka, Solapur - 413001 and printed at Palavi Printers, 129/498, Vasant Vihar, Nr. Old Pune Naka, Solapur - 413001 and published at 129/498, Vasant Vihar, Nr. Old Pune Naka, Solapur - 413001 editor Deepak C. Nanaware.

**Disclaimer**

The views expressed by the authors in their articles, reviews etc. in this issue are their own. The Editor, Publisher and owner are not responsible for them. All disputes concerning the journal shall be settled in the court at Solapur, Maharashtra